MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## आ. पंकजाताई आमच्या सर्वस्व

आ. पंकजाताई मुंडे आमच्या सर्वस्व आहेत. त्यांच्या विषयी आमच्या मनात कुठलीही शंका नाही, त्यांनी आतापर्यंत जीवनात चांगलेच निर्णय घेतले आहेत, त्या चुकीच्या कांही करत नाहीत, त्यांच्याविषयी आमच्या नितांत आदर आहे, त्यामुळे या बैठकीत त्यांच्यावर आम्ही कुठल्याही प्रकारची नाराजी व्यक्त करण्याचे कांही कारणच नाही. याउलट आमचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, नगरसेवक पवन मुंडे आणि आमचे अनेक कार्यकर्ते कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आयोजित केलेल्या गणेशोत्सव व इतर कार्यक्रमांना हजर राहीलेले आहेत त्यामुळे अशा प्रकारची बातमी देणाऱ्यांनी चुकीच्या उद्देशाने ही बातमी दिली आहे असे लोहिया म्हणाले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -०३ | शुक्रवार दि.२० सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -03 | FRIDAY DT.20 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# पंकजाताई मुंडे आमच्या सर्वस्व ; 'त्या' म्हणतील तीच पूर्वदिशा- जुगलकिशोर लोहीया यांची स्पष्टोक्ती

## कार्यकर्त्यांची कसलीही नाराजी नाही, कांही वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या चुकीच्या - डॉ. शालिनीताई कराड, ॲड.अरूण पाठक

परळी (प्रतिनिधी)

भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे या आमच्या सर्वस्व असून त्या म्हणतील तीच पूर्वदिशा असेल. परळी शहर व मतदारसंघातील कोणताही कार्यकर्ता त्यांच्या आज्ञेबाहेर नाही किंवा त्यांच्यावर नाराज नाही, कोणीतरी चुकीची माहिती पसरवून संभ्रम निर्माण करत आहे. यासंदर्भात कांही वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या हया चुकीच्या आहेत, त्यात अजिबात तथ्य नाही, आम्हा कार्यकर्त्यांची तशी कुठलीही भूमिका नाही असे भाजपचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहीया यांनी स्पष्ट केले आहे.

या संदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना शहराध्यक्ष लोहीया पुढे म्हणाले की, रविवारी शहरातील कांही पाच-सहा कार्यकर्त्यांनी फंड न मिळाल्याच्या नाराजीबद्दल सगळ्यांना फोन करुन मिटींगला या असे सांगून बोलावले. मिटिंगबद्दल कोणालाही स्पष्ट निर्देश नव्हते. पक्षाचे जबाबदार पदाधिकारी म्हणून आम्ही काही ज्येष्ठ मंडळी त्याठिकाणी गेलो होतो. यावेळी कांही कार्यकर्त्यांनी बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आम्हाला विचारात घेत नाहीत, आमच्या वार्डात फंड देत नाहीत, ग्रामपंचायतीच्या सरपंचांना देखील कसलाही निधी देत नाहीत अशी तक्रार केली. हा विषय आपण आ.पंकजाताई मुंडे यांच्या कानावर घालू एवढीच चर्चा या बैठकीत झाली होती असं ते म्हणाले.



आम्ही परळी मतदारसंघातील व जिल्ह्यातील सर्व जनता, कार्यकर्ते आ. पंकजाताई मुंडे यांच्याकडे अत्यंत अपेक्षेने पाहत आहोत. ताईंनी पाच वर्षे जो त्रास सहन केला त्यानंतर केवळ दोनच महिने झाले त्यांना आमदारकी मिळाली आहे.दररोज त्या भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा, जे.पी.नड्डा यांच्यासमवेत राज्याच्या प्रमुख कोअर कमिटीत काम करताना दिसत आहेत. आता निवडणूकीची वेळ आहे, पुढचे दोन महिने राज्यभर फिरल्या तरी चालेल, त्यांनी आत्ताच आम्हाला वेळ द्यावा अशी आमची अपेक्षा देखील नाही. त्यांनी जास्तीत जास्त आमदार निवडून आणावे, पक्षाचे सरकार आणण्यात योगदान द्यावे आणि मंत्री म्हणून मग आमच्या जीवनातल्या आमच्या अडचणी सोडवाव्यात असे लोहीया म्हणाले.
आ. पंकजाताई मंत्री असताना आम्हांला कधी मागावं लागलं नाही, कधी कमी पडलं नाही, तथापी सध्या होणारी कुचंबना पंकजाताई स्वत: निर्णय प्रक्रियेत नसल्याने होत आहे. शासकीय निर्णय प्रक्रियेमधल्या त्या नाराज्या आहेत. या विषयावर ज्या बातम्या आलेल्या आहेत तशा प्रकारची आमची कुठलीही भूमिका नाही असे लोहीया यांनी म्हटले आहे.

### ताईंवर आमचा नितांत विश्वास - डॉ.शालिनी कराड

आमच्या नेत्या आ.पंकजाताई मुंडे आमचे सर्वस्व आहेत. त्यांचं जीवन आमच्यासाठी आदर्श आहे. त्यांनी कधीही चुकीच काम केलं नाही. त्या ज्या मार्गाने जात आहेत त्यात त्यांच्या पाठीशी आम्ही सर्व कार्यकर्ते खंबीरपणे उभे आहोत, अशी प्रतिक्रिया भाजप महिला मोर्चाच्या नेत्या डॉ.शालिनीताई कराड यांनी दिली.

### पंकजाताईंमुळे चांगले दिवस येतील - अरुण पाठक

आ.पंकजाताई मुंडे या अत्यंत तत्ववादी नेत्या आहेत, त्यामुळेच आम्ही त्यांच्या पाठीशी नेहमीच उभे असतो व भविष्यातही राहु. त्यांचा संघर्ष आम्ही जवळून पाहिला आहे. आता त्यांना चांगले दिवस आले तर आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना देखील चांगले दिवस येतील तथापि बैठकीच्या अनुषंगाने आलेल्या बातम्या चुकीच्या आहेत, त्यात काडीमात्र तथ्य नाही अशी प्रतिक्रिया युवा मोर्चाचे ॲ. अरुण पाठक यांनी दिली.

# प्रा.ईश्वर मुंडे
# माजलगाव मतदार संघातील उगवते नेतृत्व

गांजपूर ता.धारूर चे सुपुत्र प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी सन.१९९५ ते २०१६ या कालावधीत जिल्हा परिषद शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी केली. ईश्वर शिक्षण प्रसारक मंडळ गांजपूर संचलित जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,गांजपूर व जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय,आसोला तसेच जीवन शिक्षण बालगृह गांजपूर व केज च्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांची जडन घडन चालू आहे. १९९९ पासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी संबंधित असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी मा.खा.शरदचंद्र पवार साहेब यांना दिल्लीत भेटून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतली.नंतर एम.आय.टी.पुणे येथे राजकिय नेतृत्व गुण विकास प्रशिक्षण घेतले.२०१६ साली आमदार नसलेल्या आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सक्रीय कार्य सुरू केले.

आ.प्रकाशदादा सोळंके यांनी दिलेल्या धारूर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालूकाध्यक्ष पदाच्या संधीचे सोने करून तालुक्याला स्वत:चे संपर्क कार्यालय,गाव,वाडी,वस्ती,तांड्यापर्यंत राष्ट्रवादीचा विचार पक्षातील सर्व सहकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने पोहचवून राजकारणाला समाजकार्याच्या जोडीने जन मत परिवर्तन केले.दुष्काळी परिस्थतीत पाणी फाऊंडेशनच्या कामात गावोगावी श्रमदान व आर्थिक मदत केली.

विरोधी पक्ष तालुकाध्यक्ष म्हणून जनतेच्या हितासाठी शासन विरोधी दोलने,रस्तारोको,हल्लाबोल,निर्दशने,उपोषणे केली. परिणामी भाजप बहूल धारूर तालुक्यात भाजपचे उमेदवार रमेश आडसकर यांना वीस हजार मतांची लीड मिळेल असा अंदाज लावणारांचे अंदाज मोडीत काढून राष्ट्रवादीच्या आ.प्रकाशदादा सोळंके यांना धारूर तालुक्याने ९७ मतांची लीड दिली या मध्ये प्रा.ईश्वर मुंडे यांचा सिंहाचा वाटा आहे.याचे बक्षीस म्हणून आ.प्रकाशदादा सोळंके यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष ईश्वर बाळबुधे यांना शिफारस करून प्रा.ईश्वर मुंडे यांची प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती केली.पक्षाच्या राज्यस्तरीय बैठका,मेळावे व नेत्यांच्या गाठी भेटी या मध्ये प्रा.ईश्वर मुंडे यांचे कर्तुत्व ठळकपणे दिसत आहे.पक्षाचे राज्यस्तरीय कार्यक्रम,जिल्हास्तरीय पक्ष कार्य आढावा बैठका,समन्वय व धारूर तालुक्यांतील जनतेच्या प्रश्नांची सोडवण करत आहेत,प्रामुख्याने आसरडोह जि.प.गटातील जनतेचे स्वीकारलेले पालकत्व ही भुमिका पूर्ण क्षमतेने पार पाडत आहेत.उच्च शिक्षित,सुसंस्कारीत,नम्र,मवाळ भाषीक व सुहास्य वदनी,स्वच्छ चारित्र्य असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांना असलेला प्रशासकीय सेवेचा अनुभव या मुळे प्रशासनावरची पकड,नौकरीच्या निमित्ताने कडा-आष्टी ते घाटनांदूर पर्यंतचा जन संपर्क त्यांना लाभदायक ठरेल.

गरजवंतांना व नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना सढळ हाताने केलेली मदत,शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कार्य,त्यांचे व त्यांच्या वडीलांचे विद्यार्थी गण,रोजगार मार्गदर्शतून उभे केलेले युवक,सर्व धर्मियांच्या धार्मिक कार्यक्रमातील सक्रिय सहभाग,सर्व जाती धर्मातील महापुरूषांच्या जयंती पुण्यतिथीतील सहभाग,गावोगावचे सप्ताहात मोफत किर्तन सेवा,यात्रा-जत्रा व कुस्त्या यांतील अर्थपूर्ण सहभाग,सर्व सामान्य जनतेला सहज उपलब्ध होणे या मुळे प्रा.ईश्वर मुंडे यांच्या व्यक्तीमत्वाला चार चॉंद लागलेले आहेत.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार



असे सर्वगुण संपन्न व्यक्ती राजकारणात दुर्मिळपणे दिसतात.म्हणून तालुक्यांतील जनता त्यांना नक्कीच न्याय देईल.आ.प्रकाशदादा सोळंके यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्या गटातून आ.अजितदादा पवार गटात प्रवेश केल्यावर प्रा.ईश्वर मुंडे हे खा.शरदचंद्र पवार यांच्या सोबतच राहीले. खा.शरदचंद्र पवार यांनी प्रा.ईश्वर मुंडे यांची पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल च्या राज्य प्रमुख पदी निवड केली.
जनाधार असलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांना प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील,माजी मंत्री जितेंद्र आव्हाड,युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब भाई शेख,बीड जिल्हाध्यक्ष आ.संदिपभैया क्षीरसागर यांचा असलेला संपर्कामुळे बीड लोकसभा निवडणूक २०२४ साठी संभाव्य उमेदवार म्हणून जिल्हाभरात संपर्क वाढवलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांना जनतेने पसंती दिली होती. बीड लोकसभेचे तिकिटाने हुलकावणी दिलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांना माजलगाव विधान सभा मतदार संघात महा विकास आघाडी च्या माध्यमातून चांगले भविष्य आहे. प्रा.ईश्वर मुंडे यांच्या कार्याने माजलगाव मतदार संघाचे उज्ज्वल भविष्य घडेल हे नक्कीच.



# संतप्त विनाअनुदानित शिक्षकांचा आत्मदहनाचा इशारा

## आंदोलनाचा ५० वा दिवस आजची कॅबिनेट रद्द, शिक्षकांची घोर निराशा, मंगळवारपर्यंत जीआर काढा अन्यथा आत्मदहन

बीड (प्रतिनिधी)

गेल्या ५० दिवसांपासून शिक्षक उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील हजारो शिक्षक वाढीव टप्प्याचा जी आर आणि आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमधील हे शिक्षक गेल्या ५१ दिवसांपासून आपल्या हक्कांसाठी आंदोलन करत आहेत. शिक्षणमंत्र्यांकडून वाढीव टप्प्याचा जी आर काढण्यात येईल, १८ तारखेला आपली कॅबिनेट आहे त्यावेळी निर्णय घेतला जाईल असे काही दिवसांपूर्वी सांगण्यात आले होते, परंतु ती झालीच नाही. काल एकोणीस तारखेला कॅबिनेट होईल अशी आशा असतानाच एकोणीस तारखेची कॅबिनेट ही रद्द झाल्याने सर्व शिक्षकांची घोर निराशा झाली असून आता सोमवार दि. २३ रोजी कॅबिनेट असल्याचे समजते.

अनेक दिवस कॅबिनेट बाबत चालढकल आणि या आंदोलनाकडे सरकारने फारसे लक्ष न दिल्याने हे शिक्षक संतप्त झाले आहेत. सरकारला आता या शिक्षकांनी मंगळवार दिनांक २४ सप्टेंबर २०२४ पर्यंत अल्टिमेटम दिला असून येत्या सोमवारी होणाऱ्या कॅबिनेट बैठकीत वाढीव टप्प्याचा आदेश जर निघाला नाही तर बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा या सर्व संतप्त शिक्षकांनी सरकारला दिला आहे. सदर आशयाचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कोल्हापूर, पोलीस अधीक्षक कोल्हापूर, पोलीस निरीक्षक लक्ष्मीपुरी यांना देण्यात आले आहे.

विनाअनुदानित शाळांमधील या शिक्षकांना गेली अनेक वर्ष तुटपुंजा पगार मिळतोय. १२ जुलैला सरकारने अंशत: अनुदानित शाळांसाठी वाढीव टप्पा अनुदान जाहीर केले होते. पण या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने या शिक्षकांनी आंदोलन तीव्र केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या आंदोलक शिक्षकांची संख्या जवळपास ६७ हजार इतकी आहे. हक्काचे अनुदान मिळत




नसल्याने हे सगळे शिक्षक बेमुदत आंदोलनासाठी बसले आहेत. या ५० दिवसांपैकी ११ दिवस विनाअनुदानित शिक्षकांनी शिक्षण उपसंचालक कोल्हापूर कार्यालयासमोर आमरण उपोषण केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, रस्ता रोको, तसेच अनेक आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधींना, आमदार खासदारांना भेटून निवेदनही दिलेली आहेत. त्यानुसार लोकप्रतिनिधींनी शिक्षणमंत्री, मुख्यमंत्री, मंत्रालयातील जबाबदार अधिकारी यांना फोन करून पाठपुरावा देखील केलेला आहे. मुख्यमंत्री शिक्षणमंत्री यांनीही वाढीव टप्प्याचा जीआर कॅबिनेट बैठकीत काढतो असे सर्वांना सांगितले आहे. परंतु कॅबिनेट बैठकच लांबत असल्याने हे शिक्षक संतप्त झाले आहेत.

यावेळी जिल्हाध्यक्ष शिवाजी कुरणे, दादा लाड केदारी मगदूम, सुभाष खामकर, शशिकांत खडके, अनिल ल्हायकर, वैद्यनाथ चाटे,जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम शिंदे, सुरेश कदम, रामदास जामकर, भागवत यादव, पी एस देशमुख, प्रेमकुमार बिंदगे, अरविंद पाटील, राजू भोरे ,भानुदास गाडे, कन्हैय्या पगार, विक्रांत नेरकर, अविनाश वाघ, संग्राम कांबळे, मुक्ता मोटे स्मिता उपाध्ये, नेहा भुसारी, गौतमी पाटील, भाग्यश्री राणे, विद्या पूजेरी यांच्यासह राज्यातील शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.येत्या सोमवारी कॅबिनेट बैठक असल्याचे समजते. गेली दोन महिने शिक्षकांनी मोठा संघर्ष केलेला आहे. याचे शासनाने भान राखून कोणतीही गुंतागुंत किंवा धोका न करता शिक्षकांच्या मागण्याप्रमाणे मंगळवार दिनांक २४ पर्यंत जीआर काढावा. अन्यथा शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे सामूहिक आत्मदहन करण्यात येईल, आणि याची सर्व जबाबदारी सरकारवर राहील.

# अंबड बस-ट्रक अपघाताची घटना वेदनादायी - धनंजय मुंडे

## जखमींना योग्य उपचार मिळावेत यासाठी मुंडेंच्या प्रशासनास दूरध्वनीवरून सूचना

मुंबई (प्रतिनिधी)

गेवराई वरून जालन्याकडे जात असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसला अंबड जवळ संत्र्याच्या ट्रकने दिलेल्या धडकेत एसटी बस मधील सहा तर ट्रक मधील दोन अशा एकूण आठ जणांचा मृत्यू झाल्याचे समजले असून ही दुर्घटना अत्यंत वेदनादायी असल्याचे म्हणत जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या भीषण अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. याच अपघातात आपला जुना सहकारी, बसचालक बंडू बारगजे यांचे दुःखद निधन झाले असून, त्याबद्दलही धनंजय मुंडे यांनी दुःख व्यक्त केले आहे.



गेवराई वरून जालन्याकडे जात असलेल्या एसटी बसला सकाळी नऊच्या सुमारास अंबड जवळ एका संत्र्याच्या ट्रकने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एसटी बसचे चालक वाहक व अन्य चार प्रवासी तर ट्रकचा चालक व क्लीनर अशा एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तर जवळपास १५ ते २० जण जखमी असून यापैकी नऊ जणांना प्रथमोपचार करून जालना येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी एका जणाची प्रकृती गंभीर असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी सांगितले आहे.

तर किरकोळ जखमी असलेल्या उर्वरित प्रवाशांना अंबड येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. दरम्यान बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पोलीस प्रशासनाकडून अपघाताची माहिती घेऊन जखमींवर योग्य उपचार केले जावेत, याबाबत जालना जिल्हा प्रशासनास आवश्यक सूचना दूरध्वनीवरून केल्या आहेत. हा अपघात अत्यंत दुर्दैवी असून मयत प्रवाशांना श्रद्धांजली अर्पण करतो तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. जखमी प्रवाशांना देखील योग्य उपचार मिळून त्यांना लवकरात लवकर आराम मिळो, अशी प्रार्थना करतो, असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

# सावित्री-फातिमा सद्भावना मंच बीडची नूतन कार्यकारिणी जाहीर

## भागवत तावरे, अमरसिंग ढाका सुफ़ियान मणियार, शेख अब्दुल हमीद, एस.एम.युसूफ़ यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

सावित्री-फातिमा सद्भावना मंच बीड च्या कार्यकारिणीची बैठक शहरातील नीलकमल हॉटेल येथे ज्येष्ठ विचारवंत व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सय्यद रफिक पारनेर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत मंचाच्या नूतन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारणीत लोकपत्रकार भागवत तावरे यांची अध्यक्षपदी, अमरसिंग ढाका व सूफ़ियान मणियार यांची उपाध्यक्षपदी, शेख अब्दुल हमीद यांची सचिवपदी तर मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.शहरात शांती, सद्भावना अबाधीत राहावी, सामाजिक सलोखा वाढावा या उदात्त हेतूने स्थापन करण्यात



आलेल्या सद्भावना मंचचा एक वर्षाचा कार्यकाल संपल्यामुळे वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सदस्यांच्या सहमतीने वरील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.या बैठकीत ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. रफिक पारनेरकर यांनी वरील कार्यकारिणीची घोषणा करून नवीन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नवीन सल्लागार मंडळात प्रा. नागरगोजे, प्रसिद्ध उद्योगपती गौतम खटोड, मौलाना इलयास पटेल, सय्यद शफीक हाश्मी, प्रा. शेख इलयास, प्रशिक वंजारे, ड. ओमप्रकाश गायकवाड, इंजि. जे. एन. भोरे, काळे सर यांचा समावेश करण्यात आला आहे. बैठकीच्या शेवटी सावित्री-फातिमा सद्भावना मंचचे नवनियुक्त सचिव शेख अब्दुल हमीद यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि ही बैठक संपन्न झाली.

# आर्यन वाव्हळ यांना रसायनशास्त्रात पीएचडी पदवी

बीड : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील मौजे असोला येथील आर्यन अनुरथ वाव्हळ यांना नुकतीच पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेमध्ये (एनसीएल) तसेच वैज्ञानिक आणि नाविन्यपूर्ण संशोधन अकादमी(एसीएसइआर) अंतर्गत पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. आर्यन वाव्हळ यांची शैक्षणिक पार्श्वभूमी उल्लेखनीय असून,त्यांनी सेट,नेट जीआरएफ आणि गेट या प्रमुख परीक्षांमध्ये यशस्वी कामगिरी केली आहे.सध्या ते इंडियन ऑइल कॉर्पोरेशनमध्ये वरिष्ठ गुणवत्ता नियंत्रण अधिकारी म्हणून मुंबईत कार्यरत आहेत.आर्यन वाव्हळ यांनी शास्त्रज्ञ डॉ.आशा एस.के. यांच्या मार्गदर्शनाखाली बॅच अँड कंटिन्यूस फ्लो सिंथेसिस ऑफ रायलीनबीसइमाइड पॉलिमर्स अँड देयर एप्लिकेशन इन एनर्जी स्टोरेज या विषयावर शोधप्रबंध सादर केला. या संशोधनामध्ये त्यांनी अत्याधुनिक पद्धतीने पॉलिमर्स विकसित केले असून, या पॉलिमर्सचा उपगोय सूपरकपैसिटर ऊर्जा स्टोरेजमध्ये प्रभावी वापर केला आहे. त्यांनी तयार केलेल्या मटेरियलचे व्यावहारिक उपकरण पातळीवर प्रात्यक्षिक सादर करून नव्या तंत्रज्ञानाची प्रभावीता दर्शवली.आर्यन वाव्हळ यांचे संशोधन कार्य जागतिक स्तरावरील प्रमुख शोधनिबंध प्रकाशनांमध्ये,जसे की अमेरिकन केमिकल सोसायटी (एसीएस) आणि रॉयल सोसायटी ऑफ



केमिस्ट्री (आरएससी), प्रसारित झाले आहे. त्यांच्या कार्यासाठी एसपीएसई-मैक्रो कॉन्फरन्समध्ये त्यांना सर्वोत्तम सादरीकरणासाठी प्रथम पारितोषिक मिळाले, ज्यामुळे त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

वैज्ञानिक संशोधन क्षेत्रामध्ये आर्यन वाव्हळ यांच्या संशोधनाचे विशेष कौतुक होत आहे. रासायनिक प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांनी त्यांचे कार्य पाहून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.डॉ. आर्यन वाव्हळ यांनी त्यांच्या मार्गदर्शक डॉ. आशा एस.के.यांचे विशेष आभार मानले आहेत. त्यांनी त्यांचा शोधप्रबंध महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित केला असून,याबद्दल त्यांची विशेष प्रशंसा होत आहे. आर्यन वाव्हळ यांनी त्यांचे आई-वडील आणि कुटुंबीयांनाही हा शोधप्रबंध समर्पित केला आहे. त्यांच्या या यशामुळे बीड जिल्ह्याचे राष्ट्रीय स्तरावर नाव उंचावले आहे,आणि त्यांच्या कार्यामुळे युवा संशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले आहेत.

# रास्ता रोको आंदोलनास उपस्थित रहा.. भाई पांचाळ,भाई सोळंके

तालखेड (प्रतिनिधी)

गेल्या दहा वर्षापासून शेतकरी प्रचंड संकटात असताना आणि शेतकऱ्याच्या कुटुंबावर कर्जाचा डोंगर झाला असताना शासनाने अद्याप सरसकट कर्जमाफी दिलेली नाही याशिवाय माजलगाव तालुक्यातील जय महेश एन एस एल शुगर कारखान्याने ऍसिडचे व मळीचे घाण पाणी माजलगाव धरणाच्या पाटात सोडल्याने अनेक गावातील पाणी दूषित झाले असून मनुष्यासह पशुच्या जीवितास धोका निर्माण झाला असून एन एस एल शुगर्स कारखान्यावर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना गाळप परवाना देऊ नये तसेच २०२०,२३ २४ सालचा पिक विमा शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग करा, शेतकऱ्याच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव द्या, आदी मागण्यासाठी दिनांक २१सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता गंगामसला येथे होणाऱ्या रस्ता रोको आंदोलनात शेतकरी बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, तालुका सहचिटणीस भाई राहुल सोळंके, तालुका सहचिटणीस भाई सतीश शेजुळ, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, भाई राधाकृष्ण पांचाळ, भाई चांगदेव शेजुळ पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई आनंत चव्हाण जेष्ठ नेते भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई माऊली चंदनशिव भाई सुदाम चव्हाण, भाई राजेश्वर मोरे आदींनी केले आहे.

# बहुजन जनता पक्ष येत्या विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त उमेदवार देणार-अभिमान कांबळे

आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्रात सध्या राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे, त्याचबरोबर जनतेचे विविध प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी गेल्या अनेक दिवसापासून बहुजन जनता पक्ष संपूर्ण महाराष्ट्र मध्ये दिन दलित गोरगरिबांसाठी कार्य करत आहे. पक्षश्रेष्ठ बालाजी घुमाडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली गोरगरीब कामगार वेठबिगारी शेतकरी शेतमजूर बहुजन समाज बारा बलुतेदार यांच्या हिताचे प्रश्न सरकारी दरबारी मांडून ते सोडवण्याचा प्रयत्न करीत आहेत वाढती महागाई यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीयांची खूप हाल होत आहेत शेतकऱ्याला योग्य भाव मिळत नाही विज दर वाढले आहे काही ठिकाणी ओला दुष्काळ आहे तर काही ठिकाणी कोरडा दुष्काळ आहे सरकारी शाळेचा प्रश्न आहे महाराष्ट्र मध्ये आज महिला सुरक्षित नाहीये.



सरकार आंधळं आणि बहिर झालेला आहे बहुजन जनता पक्षाचे कार्यकर्ते होणाऱ्या अन्य अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी आणि सरकारला जागा करण्यासाठी काम करत आहेत म्हणून सरकारला जागा करण्यासाठी येत्या काळामध्ये बहुजन जनता पक्ष महाराष्ट्र मध्ये जास्तीत जास्त आपले उमेदवार देणार आहे असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अभिमान कांबळे यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली.

# प्रित्यार्थ सेवापूर्ती सन्मान सोहळा जि,प,प्राशा देवणी खूर्दचे मुख्याध्यापक कांत कांबळे यांचा सह पत्नीक निरोप समारंभ मोठया उत्साहात

देवणी ।लक्ष्मण रणदिवे

देवणी तालुक्यातील देवणी खूर्द,येथील जि,प,प्राशाला या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक शासनाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले या वेळी यांचा सेवानिवृत्ती व सेवापुर्ती गुणगौरव सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सहपत्नीक सत्कार व निरोप समारंभ देण्यात आला यावेळी याकार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून एस,बी,साबणे केंद्र प्रमुख वडमुरंबी गौडगाव,सत्कारमुर्ती कांत कांबळे मुख्याध्यापक,संजय शिंदाळकर गट शिक्षणाधिकारी देवणी,अनिल कांबळे, इचूरे शिवाजी,मनिषा निलेंगेकर होसूर संरपच, साधन व्यक्ती वजनम राजेंद्र, जाधव राजकुमार,सरपंच यशवंत कांबळे,संजय गरड,अक्षय शिगडे,संदीप पाटील शा,व्यवस्थापण समीतीचे अध्यक्ष, लक्ष्मण रणदिवे उपाध्यक्ष शा,व्या,समिती,जगताप एम व्ही, कापडे टी एन,नरवटे केशव मा,केंद्र प्रमुख,चंद्रकांत मोटेराव मुख्याध्यापक,यादूल पठाण माजी शा,व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सहशिक्षक पुंड भरत, एस पी, बिरादार,तेजवाड सर, चाडेश्वर सर, अंगणवाडी कार्यकर्ती दैवशाला कांबळे, सरोजा गायकवाड,मतदनीस होशाबाई सारगे,आयोध्या रणदिवे,आशा शोभा रणदिवे,आदी यावेळी मुख्याध्यापक




कांत कांबळे यांना शाळेच्या वतीने व गावकऱ्याच्या उपस्थित गौतम बोद्ध डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमिची भेट देऊन सह पत्नीक यांचा सन्मान करण्यात आले निरोप मोठ्या उत्साहात संपन्न झाले यावेळी विद्यार्थी,ग्रामपंचायत सदस्य,शालेय समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नेकनूर पोलिसांची बेलखंडीत धाड; साडेचार किलो गांजा जप्त

## नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीत गांजाची विक्री जोरात सुरू

चौसाळा (प्रतिनिधी)

गायरान जमिनीत गांजाची लागवड केल्याची माहिती नेकनूर पोलिसांना मिळताच बेलखंडी पाटोदा येथे कारवाई करत साडेचार किलो गांजा ची झाडे जप्त करण्यात आली. बेलखंडी शिवारात असलेल्या गायरान जमीन सर्वे नंबर २१ मध्ये गांजाची लागवड केल्याची गुप्त माहिती नेकनूर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या अनुषंगाने सपोनी चंद्रकांत गोसावी, पो उप नि रोकडे, मंडल अधिकारी दरपे, शासकीय पंच, पोलिस स्टेशन स्टाफ सह जाऊन छापा घातला. यावेळी शेतात गांजाची १५ लहान मोठी झाडे त्याचे वजन ४.४६५ किलोग्रॅम असे मिळून आले. त्याचा दोन शासकीय पंचा समक्ष पंचनामा करून जप्त केले असून सदर जमीन कसणारे मोहन किसन मोरे,महावीर मोहन मोरे, संतोष मोहन मोरे,जितू मोहन मोरे सर्व रा. बेलखंडी यांच्या विरोधात नेकनूर पोलिसात गुरन २७३/२०२४ २०()अ१,८(क) एनडीपीएस अक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान ही कारवाई सपोनि चंद्रकांत गोसावी, पीएसआय अप्पासाहेब रोकडे, पो.ह.राऊत,पो.ह डोंगरे, पो.ह बळवंत,पोना भंडाणे, शपोना राऊत, पोना राख, पोअ तांदळे, काळे, क्षीरसागर, ढाकणे यांनी केली असून गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि चंद्रकांत गोसावी हे करत आहेत.

# बीड तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत ट्विंकलिंग स्टारच्या संघाचे घवघवीत यश

## इंग्लिश स्कूल मे प्रथम क्रमांक पटकावल्याने सर्व स्तरातून अभिनंदन

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील सुप्रसिद्ध असणाऱ्या ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या मुलीच्या संघाने कबड्डी स्पर्धेत यश खेचून आणत बीड तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला. इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथमच सर्व संघावर मात करत बीड तालुक्यातून प्रथम क्रमांक आल्याने सर्व स्तरातून त्यांच्या अभिनंदन होत आहे. दिनांक १२ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रिडा संकुल येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुलीच्या संघाने शानदार खेळी करुन अंतिम फेरीत मजल मारली. या संघाने बलवंत कदम माध्यमिक स्कूल ला ५ गुणांनी मात करुन विजयाची सलामी दिली. तर उपांत्य फेरीत श्री शिवाजी विद्यालय बीडच्या संघाला २०-३२ फरकाने नमवून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला.



बीड तालुक्यात नव्हे तर संपूर्ण जिल्हात प्रथम च इंग्रजी मीडियम स्कूलने क्रीडा स्पर्धेत आपला दबदबा निर्माण केला आहे. या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. पंडित चव्हाण व तालुका क्रीडा अधिकारी अनिकेत केल तसेच तालुका संयोजक अभिजित तांदळे व उज्ज्वल गायकवाड आदी मान्यवर होते. या संघामध्ये कादंबरी मोरे , आदिश्री गुंड , प्रियांशी पवार, श्रेया भडके, साक्षी हजारे, श्रवणी चोरमळे, तन्वी चव्हाण, आश्लेष घुले, जीविक मलनी, ,यशश्री लोंढा, अनया ताठे, समीक्षा वळे यांनी उत्तम कामगिरी करत विजयीश्री खेचून आणले .या यशाबद्दल स्कूल चे चेअरमन गणेश मैड, स्कूल संचालिका शीतल मैड, स्कूल डायरेक्टर कोमाथ भास्करन, प्राचार्या जयश्री कदम, उप प्राचार्य दीपक झा , उप प्राचार्य कृष्णाकुमार, परिवेशिका मेरी अलेंझांडर, स्वाती राठोड, क्रीडा शिक्षक अशोक चौरे, दिनेश ढाकणे आदीनी सर्व विजय संघातील खेळाडूंचे अभिनंदन करून कौतुक केले आणि पुढील होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# राहुल शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक बिड शहर उपाध्यक्षपदी निवड

नाळवंडी (प्रतिनिधी)


बीड शहरातील युवक नेता म्हणून आपली स्वतःची ओळख निर्माण करून,लोकांच्या समस्या सोडवण्याचे काम राहुल शिंदे यांनी आज पर्यंत केले, एकनिष्ठपणे आपली जबाबदारी पार पाडत असताना अनेक प्रसंग मागे टाकत आज पक्षाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली, डॉ. योगेश क्षीरसागर सारख्या नेतृत्वासोबत अनेक वर्ष एकनिष्ठपणे काम केले. एकनिष्ठपणे केलेल्या कामाची पोचपावती म्हणून दिनांक १८/९/ २०२४ वार: बुधवार रोजी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते डॉ.योगेश क्षीरसागर तसेच सचिन जाधव त्याचबरोबर शुभम कातंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत राहुल शिंदे या युवकाची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या बीड शहर उपाध्यक्षपदी निवड करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या,या वेळी योगेश शिरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षासाठी आणि या बीड शहरातील जनतेसाठी तन-मन-धनाने काम करू असे यावेळी राहुल शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली, या पदाचा पदभार स्वीकारताना राहुल शिंदे यांचा सगळीकडे अभिनंदन होताना दिसत आहे.

# मांजरसुंबा येथे रविवारी मोफत आरोग्य शिबिर

### गरजूंनी शिबिराचा लाभ घ्यावा -डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथे महिला वारकरी आश्रमात रविवारी (दि.२२) सकाळी १० ते ५ या वेळेत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



बीड विधानसभा मतदारसंघात वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांची गरज पाहता मोफत आरोग्य शिबिरे आयोजित केलेली आहेत. आतापर्यंत झालेल्या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. आता मांजरसुंबा परिसरातील नागरिकांच्या मागणीला प्रतिसाद देत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात हृदयाची अन्जिओग्राफि, कॅन्सर शस्त्रक्रिया, अजिओप्लास्टी, मुत्रमार्ग शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, स्त्रियांचे आजार अशा १७ आजारावर निदान व मोफत उपचार केले जाणार आहेत. रुग्णाला पुढील उपचारासाठी गरज असल्यास सोय करण्यात आली आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ९४२१६१५९२८, ८४२११०५४३०, ८२०८९०७७५१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, मोफत आरोग्य शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

# राहुल गांधींबद्दल अपशब्द बोलणाऱ्या आ.संजय गायकवाड व खा.अनिल बोंडे यांच्यावर गुन्हे दाखल करा

## भिमशक्तीचे उपजिल्हाधिकारी व पोलिस निरीक्षकांना निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

राहुल गांधी यांच्याबद्दल अपशब्द बोलणारे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड व खासदार अनिल बोंडे यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी भिमशक्तीचे जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी उपजिल्हाधिकारी व पोलिस निरीक्षक यांना गुरूवार, दिनांक १९ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री खासदार चंद्रकांतजी हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत व बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी धर्मनिरपेक्ष लढणारी सामाजिक संघटना भिमशक्तीच्या वतीने उपजिल्हाधिकारी व पोलिस निरीक्षक, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अमेरिकेच्या वॉशिंग्टन शहरामध्ये राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करीत असताना एका विद्यार्थीनीच्या प्रश्नाचे उत्तर देताना असे वक्तव्य केले की, भारतामध्ये जोपर्यंत जातीवाद आहे, सामाजिक असमानता आहे. तोपर्यंत आरक्षण राहणार आणि जेव्हा भारतामधून जातीवाद संपेल आणि समानता निर्माण होईल. त्यावेळेस आम्ही आरक्षण संपविण्याचा विचार करू या वक्तव्याचा बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी विपर्यास करून राहुल गांधी यांच्याबद्दल असे वक्तव्य केले की, जो राहुल गांधींची जीभ छाटेल त्याला अकरा लाख रूपयांचे मी बक्षीस देणार असे वक्तव्य केले. तसेच खा.अनिल बोंडे यांनी सुध्दा राहुल गांधी यांच्या जिभेला चटके दिले पाहिजेत असे वक्तव्य केलेले आहे. या अपशब्दावरून असे दिसून येते की, संजय गायकवाड व खा.अनिल बोंडे यांच्या मनात राहुल गांधी यांच्याबद्दल राजकीय द्वेष आहे. त्यामुळे आ.गायकवाड व खा.बोंडे यांच्या या भुमिकेचा व त्यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध आम्ही करीत आहोत. तरी बुलढाण्याचे आ.गायकवाड व खा.बोंडे यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करून गुन्हा नोंद करण्यात यावा. असे नमूद केले आहे. सदरील निवेदनावर भिमशक्तीचे जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात, जिल्हा उपाध्यक्ष यशपाल बनसोडे, भाऊसाहेब निसर्गंध, धीमंत राष्ट्रपाल, संघर्ष इंगळे, साळवे, शेख अलोद्दीन, प्रेमजीत हजारे, अभय वाघमारे, रवि आवाडे, संकेत आवाडे, धीरज आवाडे, सुमीत आवाडे, निखिल भोसले, नागेश डोळसे, शिवसागर धोत्रे, कैलास मस्के, किरण घुमरे, सागर निरगुळे, राहुल जोगदंड, आदित्य चौरे, नितीन तरकसे, आदित्य मासुळे, राम मोरे, अभिनय सरवदे, सम्राट कांबळे, कैलास सरवदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राहुल गांधींच्या विरोधात वक्तव्य करणाऱ्या आ. संजय गायकवाड यांच्या प्रतिमेस बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने जोडो मारो आंदोलन

## संजय गायकवाड यांचे तोंड काळे करणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस देणार - गणेश बजगुडे पाटील

अ. भा. काँग्रेसचे नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांच्या विरोधात स्वतःच्या प्रसिध्दीसाठी मुक्ताफळे उधळून राहुल गांधी यांची जीभ छाटनाऱ्यास ११ लाखाचे बक्षीस ठेवणाऱ्या वाचाळवीर आमदार संजय गायकवाड यांचा आज बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करत जोडे मरो आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे म्हणाले की, राहुल गांधी देश की आंधी है, भारत जोडोच्या माध्यमातुन कन्याकुमारी पासुन काश्मीर पर्यंत डायरेक्ट लोकांशी असलेला संपर्क व देशभरात त्यांची वाढत चाललेली लोकप्रियता पाहून सत्ताधाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली असुन जाणीव पुर्वक वारंवार राहुल गांधींना टार्गेट केले जात आहे. त्यांच्या बद्दल चुकीच्या अफवा पसरवल्या जात आहेत. त्यांनी अमेरिकेमध्ये एका इंग्रजी व्रत वहिनीला दिलेल्या मुलाखतीत असे सांगितले की या देशात समानता येई पर्यंत आरक्षण आवश्यक आहे परंतु त्यांच्या विधानांची तोडफोड करून राहुल गांधी आरक्षण रद्द करण्याची भाषा करत आहेत असे दर्शविले जात आहे. परंतु असे कुठेही राहुल गांधी बोललेले नसताना निवडणुका जवळ आल्याने व सत्ताधाऱ्यांना आपला पराभव दिसुन येत असल्याने अश्या स्वरूपाचे केविलवाने प्रयत्न भाजपा व एकनाथ शिंदेच्या शिवसेना कडून केले जात आहे. राहुल गांधी व काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधानाचा सन्मान करणारे असुन या देशात जातनीहाय जनगणना करून प्रत्येक जातीला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळावे यासाठी लोकसभेत आवाज उठवणारे राहुल गांधी या देशाने पाहिले आहेत. आपली आजी वडील यादेशासाठी शहीद झाले असताना संयमाने देशवासीयांसाठी लढणारे व सत्ताधाऱ्यांना घाम फोडणारे राहुल गांधी हे आता भाजपा व सत्ताधाऱ्यांना जड वाटू लागले आहेत. म्हणूनच परवा दिल्ली मध्ये भाजपाचा एक माजी आमदार तरविंदरसिंह मारवाह राहुल गांधी बाज आजा नही तो तेरा भी वही हाल होगा जो तेरी दादी का हुवा अश्याप्रकारे खुले आम राहुल गांधीना जिवे मारण्याची धमकी देतो व दोन दिवस उलटत नाहीत तर लगेच एकनाथ शिंदेच्या शिवसेना पक्षाचे आमदार संजय गायकवाड जाहीरपणे राहुल गांधींची जीभ छाटनाऱ्याला अकरा लाखाचे बक्षीस जाहीर करतो. तरी देखील गृहमंत्री यावर कुठलेही कारवाई करायला तयार नाहीत. उलट यालोकाना पाठीशी घालण्याचे काम केले जात असुन काँग्रेस पक्ष हे कदापि सहन करणार नाही. सत्ताधाऱ्यांनी आपल्या बागलबच्याना आवर घालुन कारवाई करावी नसता काँग्रेस पार्टी रस्त्यावर उतरून जशास तसे उत्तर देईल. आज बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने संजय गायकवाड यांच्या प्रतिमेस काळे फासुन जोडे मारो आंदोलन करत तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. त्याच बरोबर संजय गायकवाड यांचे तोंड काळे करणाऱ्याला बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने एक लाखाचे बक्षीस देणार असल्याचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी सांगितले.




लोकसभा निवडणुकीत मिळालेले अपयश व विधानसभा निवडणुका तोंडावर ठेवून काँग्रेस पक्ष व काँग्रेसच्या नेत्यांना जाणीवपूर्वक बदनाम करण्याचे षडयंत्र महाराष्ट्रात खपवून घेतले जाणार नाही. महाराष्ट्रातील सध्याचे शिंदे फडणवीस सरकार खोटारडे सरकार असुन खोटे बोल पण रेटून बोल हा त्यांचा उद्योग जास्त दिवस चालणार नाही येणाऱ्या निवडणुकीत त्यांचा टांगा पलटी होणार हे दिसत असल्याने चुकीचे विधान करून महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासन्याचे काम करत आहेत. बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने शिवसेना (एकनाथ शिंदे गटाचे) आ. संजय गायकवाड यांच्या वक्तव्याचा निषेध करत संजय गायकवाड यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी राहुल गांधी तुम संघर्ष करो हम तुम्हारे साथ है, राहुल गांधी जिंदाबादच्या घोषणा देण्यात आल्या. राहुल गांधीना जिवे मारने व जीभ छाटण्यासाठी जनतेने यांना निवडून दिले आहे काय? असा सवाल करत महाराष्ट्रातील जनताच याचे उत्तर देईल. विकासाच्या नावावर अपयशी ठरलेल्या सरकारची दुट्टपी भुमिका जनतेने ओळखलेली असुन जनता राहुल गांधी सोबत आहे. संजय गायकवाड यांचे तोंड काळे करणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस देणार असुन संजय गायकवाड असेल किंवा त्यांचा कर्ताकरविता यांनी कायम लोकशाहीचा अपमान केलेला आहे. निवडणुकीच्या तोंडावर चुकीची व प्रक्षोभक भाषणे करुन जातीय तेढ निर्माण करणे हा त्यांचा उद्योग महाराष्ट्राला माहीत आहे. असे गणेश बजगुडे पाटील म्हणाले यावेळी काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, इंटक जिल्हाध्यक्ष रमधन जमाले, निराधार निराश्रित विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन, तालुकाध्यक्ष शेख जाहीर, काँग्रेसचे तालुका सचिव शेख अर्शद, इंटकचे उपाध्यक्ष सखाराम बेंडगे, जिल्हा सचिव संदीप जिंझुरके, सहसचिव मधुसूदन मस्के, वैजिनाथ बर्डे, किशोर यादव, अशोक धुमाळ, शेख अक्रम, भागुराम जोगदंड, दयानंद धुरंधर, महादेव कुरवडे, मारोती आघाव, इत्यादि पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# दोन कब्रस्तानातील अतिक्रमण उठवले एक मिनार मस्जिदचे अतिक्रमण का नाही उठवली - खिजर शेख

तलवाडा (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी मुस्लिम समाजातील काही युवकांनी आपल्या पोटापाण्याचा प्रश्न भागवण्यासाठी तलवाडा या ठिकाणी मुस्लिम समाजातील कब्रस्तान च्या कडेला छोटे-मोठे व्यवसाय सुरू केले होते मुस्लिम समाजातीलच बोटावर मोजण्या इतक्या लोकांनी विधानसभेसाठी शक्कल लढून अख्खा मुस्लिम समाज आमच्या पाठीमागे आहे असे दाखवून अशा पोट भरणाऱ्या लोकांच्या विरोधात जाऊन मुस्लिम समाजाला भडकवून लोकशाही मार्गाने आंदोलन करीत अशा लोकांना उठवण्याचे काम काहींनी केले असून त्यांचे संसार उघड्यावर आले आहेत तरीपण दोन कब्रस्तानातील अतिक्रमण उठवले असताना एकमिनारचे कब्रस्तानचे अतिक्रमण का नाही उठवले असा प्रश्न स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर भाई यांनी प्रसिद्धी पत्रकार केला आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी जुने बस स्टँड शेजारी निजाम कालीन तलवाडा गावात मुस्लिम समाजाचे कब्रस्तान पाच असून तीन-तीन कब्रस्तान वर काही लोकांच्या म्हणण्यानुसार दहा वर्षापासून ह्याच लोकांच्या म्हणण्यानुसार जे मुस्लिम समाजातील युवकांना धंद्यासाठी आपल्या पोटापाण्याचा प्रश्न भागवण्यासाठी दुकानाचे पॉईंट देण्यात आले होते तसेच त्यांच्याकडून महिनाही ठरवून घेण्यात आला होता तसे ते युवकांचेही चांगले धंदे चालत होते आपला संसाराचा पोटा पाण्याचा प्रश्न भागला असे त्यांना वाटत होते तसे धंदेही त्या ठिकाणी चांगले चालत होते मात्र ज्या लोकांनी धंदे टाकण्यासाठी जागा दिली होती त्याच लोकांनी विधानसभा तोंडावर आली असता मुस्लिम समाज आमच्या पाठीमागे आहे असे दाखवून मुस्लिम समाजाची दिशाभूल करून या लोकांनी त्यांना गेवराई येथे नेले व लोकांची डोके भडकून दिनांक ९ रोजी तहसील या ठिकाणी उपोषणास बसवले शासनाला वेठीस धरून त्यांच्याकडून सात दिवसाची मुदत घेऊन दुकाने काढण्यात येते असे आश्वासन घेऊन इकडे गरीब




लोकांनी ते दुकाने काढण्यात आली आज त्यांचा पोटा पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला असून आज त्यांची संसार उघड्यावर पडले आहेत मात्र ज्या लोकांनी हे काम केले आहे विधानसभा तोंडावर आली असताना कोणाकडून काही चिरीमिरी भेटते की काय त्यामुळे असे काम केले आहे एवढा अतिक्रमणाचा पुळका असताना एक मिनार मस्जितीपाशी बोटावर मोजण्या इतक्या लोकांनी अतिक्रमण करून पक्के घरे बांधून घेतले

# कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते नुकसान भरपाई मिळणार

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला आढावा; राज्यात सोयाबीन खरेदी केंद्र तातडीने सुरु करण्याचे आदेश

### सोयाबीन खरेदी केंद्रे तातडीने सुरु करावेत-मुंडे

केंद्र शासनाने सोयाबीन खरेदीसाठी हमीभाव घोषित केले आहेत. यावर्षी सोयाबीनचे ७३.२७ लाख मेट्रिक टन इतके बंपर उत्पन्न अपेक्षित आहे. त्यामुळे राज्य शासनाने किमान हवी भावाने सोयाबीन खरेदीचा प्रस्ताव केंद्राला सादर केला होता. त्याला केंद्र शासनाने मान्यता दिली असून नाफेड व एनसीसीएफ मार्फत सोयाबीन खरेदीचे केंद्रे उभारण्याचे काम गतीने पूर्ण करावेत. राज्य शासन सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही असे प्रतिपादन कृषिमंत्री मुंडे यांनी या बैठकीत केले.

मुंबई (प्रतिनिधी)

कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्याचा कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच होणार आहे. त्यामुळे या कामातील केवायसी व इतर तांत्रिक अडचणी दूर करण्याचे, तसेच केंद्र शासनाने दिलेल्या सूचनानुसार राज्यात सोयाबीन खरेदी केंद्रे तातडीने सुरु करण्यात यावे, असे आदेश असे आदेश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.

यासंदर्भात मंत्रालयात आयोजित आढावा व नियोजन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस कृषी विभागाच्या अपर मुख्य सचिव जयश्री भोज, कृषी संचालक विजयकुमार आवटे यांच्यासह कृ२०२३षी विभागातील अधिकारी उपस्थित होते.सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक



शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५ हजार रुपये (२ हेक्टरच्या मर्यादित) अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे ९१ लाख हेक्टर वरील ८३ लाख शेतकऱ्यांना ४१९४ कोटी अनुदान वितरित करण्यात येणार आहे.

३६ लाख शेतकऱ्यांची घधउ पूर्ण

राज्यात कापूस व सोयाबीन खातेदारांची एकूण संख्या ९६.१७ लाख आहे. त्यापैकी ७५.३१ लाख शेतकऱ्यांचे क्षेत्रीय स्तरावर संमती पत्रे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६४.८७ लाख खातेदार शेतकऱ्यांचा डाटा पोर्टलवर भरण्यात आलेला आहे. त्यापैकी नमो शेतकरी सन्मान योजनेच्या डाटा सोबत ४६.८ लाख शेतकऱ्यांचा डाटा जुळला आहे. तर ई पीक पाहणी नावांच्या डेटा पैकी ३६ लाख नावे जुळलेली आहेत. त्यामुळे १० लाख शेतकऱ्यांची नावे प्रत्यक्ष पडताळणी करून जुळवावी लागणार आहेत. हे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले.

# तालुक्यात रेल्वेने आलेला दिडशे किलो गांजा जप्त



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

तालुक्यातील घाटनांदूर येथे रेल्वेने आलेला अंदाजे दिडशे किलो गांजा पोलिसांनी पकडल्याची प्राथमिक माहिती आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ व अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई ग्रामीण आणि परळी ग्रामीण ठाण्याच्या पोलिसांनी संयुक्तरित्या केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परराज्यातून बीड जिल्ह्यात रेल्वेने गांजा आणला जात असल्याची गुप्त माहिती अंबाजोगाई अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या विशेष पथकास मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे विशेष पथक तसेच अंबाजोगाई ग्रामीण व परळी ग्रामीण येथील पोलिसांनी संयुक्त टीम तयार करून रेल्वे स्थानकात रेल्वे आली असता छापा मारला. या कारवाईत अंदाजे १०० ते १५० किलो गांजा पकडण्यात आल्याची प्राथमिक माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. कारवाई पूर्ण झाल्यानंतर अधिकृत माहिती उपलब्ध होऊ शकणार आहे.

# अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या

## बदामराव पंडितांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा मतदारसंघात सातत्याने अतिवृष्टी झाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे या शेतकऱ्यांना पंचनामा न करता सरसकट आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माझ्या गेवराई विधानसभा मतदारसंघात बहुतांश गावात अतिवृष्टी झाल्याने शेतात पाणी साठवून पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. आजही अनेक भागातील शेतात पाणी साचलेले असल्याने शेतकऱ्यांना कोणतेही काम करणे शक्य नाही. कित्येक शेतकऱ्यांची पिके पाण्यात पडल्याने ती सडली आहेत. या अतिवृष्टी पीकबाधित शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यासाठी पंचनामा करत वेळ घालवण्याऐवजी, सर्वच शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट अतिवृष्टी नुकसान भरपाई तातडीने देण्यात यावी. सणासुदीचे दिवस असून शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळलेले आहे याचा सहानुभूतीपूर्वक सरकारने विचार करावा आणि तात्काळ शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे. निवेदन देताना सरपंच मुकुंद बाबर, मिलिंद वाघमारे, राजाभाऊ जावळे आदींची उपस्थिती होती.

# टाकरवन येथील असंख्य मुस्लिम कार्यकर्त्यांचा बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश

गेवराई (प्रतिनिधी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली टाकरवन येथील युवा नेते सय्यद तौफिक यांच्यासह असंख्य मुस्लिम बांधवांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे टाकरवन जिल्हा परिषद सर्कल मध्ये राष्ट्रवादी आणि भाजपला मोठे खिंडार पडले असून, शिवसेना आणखी मजबूत झाल्याचे बोलले जात आहे.



माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या गेवराई येथील निवासस्थानी दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या कार्यक्रमात, टाकरवन येथील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी मधील सय्यद तौफिक, सोहेल खान, पठाण, अबुजर इनामदार, दानिश कुरेशी, आसिफ कुरेशी, अक्कान इनामदार, हाफिज खान, साद मोमिन, शायद इनामदार, फजल खान, समीर पठाण, वसीम मोमीन, इद्रिस शेख, चाऊस भाई, शाहिद पठाण, शाकीर मोमीन, शेख कैफ, शेख तोफिक, सरफराज मोमीन, सय्यद शकील, शेख वसीम, शेख अबेद, शेख नदीम, हुसेन मोमीन, शेख आबेद, शेख रेहान, शेख अमीर, शेख खिजर, सय्यद जफर, शेख शाकीर, आरशाण पठाण, सोहेल मोमीन, शेख अभी, शेख शाहेद, अरबाज पठाण, यासीन भाई, आमिर पठाण, रशीद भाई, जुबेर पठाण, शेख तोफिक, सय्य तौफिक, शेख कैफ, गणीभाई, अशोक अण्णा, विखार भाई, उस्मान शेख, सय्यद शौबाज, सय्यद सोहेल, इफरोज शेख, मोमीन हसन, मोमीन बब्बू आदींसह असंख्य मुस्लिम कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. सर्वांच्या गळ्यात भगवे रुमाल घालून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी स्वागत केले. तुमचे आणि गावातल्या कोणत्याही व्यक्तीचे काहीही काम असो ते थेट माझ्यापर्यंत घेऊन या कोणाचेही काम आडू दिले जाणार नाही माझ्या निवडणुकीच्या काळात तुम्ही सर्वांनी माझ्या खांद्याला खांदा लावून काम करण्याचा निर्णय घेतला हे मी कधीच विसरणार नाही. या निवडणुकीत माझा कार्यकर्ता म्हणून नव्हे तर सामान्य जनतेच्या हितासाठी झगडणारा कार्यकर्ता म्हणून तुम्ही सर्वांनी काम करावे असे आवाहनही बदामराव पंडित यांनी यावेळी केले. यावेळी अमोल सुतार, मिलिंद वाघमारे, राजाभाऊ जावळे यांच्यासह बहुसंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# आदिवासी समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार -शिवाजीराव कोल्हे सर

## शाळाबाह्य तीन विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले

आष्टी (प्रतिनिधी)

एकलव्य समाज संघटनेच्या सर्व पदाधिकार्यांचा शिवाजीराव कोल्हे सरांनी सन्मान करुन शैक्षणिक दृष्ट्या प्रगतिशील करण्याचा शब्द देखील दिला.. आष्टी तालुक्यातील कोल्हेवाडी येथील आदर्श शिक्षक शिवाजीराव कोल्हे यांनी एकलव्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा आज दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी ९:०० वाजता सत्कार समारंभ आयोजित केला आणि या कार्यक्रमाला एकलव्य संघटनेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना शिवाजीराव कोल्हे सर म्हणाले की,आजही हा समाज अज्ञानाच्या खाईत गुरफडला गेला आहे.आजही हा समाज शासनाच्या लाभापासून कोसो दुर आहे. आजही या समाजाला कुठलेही रेशन कार्ड नाही,आधार कार्ड नाही,आजही या समाजाने लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला नाही.आजही या समाजाचे मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. तरी या समाजाला शासकिय योजनेचा लाभ मिळालाच पाहीजे यासाठी मी तरतुद करणार असून



यांना सर्वोतोपरी न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत कोल्हे सरांनी बोलताना व्यक्त केले आहे.यावेळी सरपंच भाऊसाहेब कोकरे ग्रामपंचायत सदस्य संतोष मस्के, देविदास गायकवाड, देविदास भवर सर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे, सुभाष माळी, दिलीप बर्डे, अनिल माळी मच्छिंद्र बर्डे,आत्माराम पवार, कैलास गायकवाड, शंकर बर्डे, काशीनाथ कर्डीले,संजय निंबाळकर,महीला आघाडीच्या नेत्या वैजंता गोलवाड, सुरेखा माळी कुसुम पवार जया पवार सह सर्व एकलव्य संघटनेचे पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या..हा कार्यक्रम सरपंच भाऊसाहेब कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला.

# अखेर लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्र गळती प्रकरणी छत दुरूस्तीचे काम सुरू

## ढवळेंच्या पाठपुराव्याला यश:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला पावसाळ्यात गळती लागली असुन रूग्णांची गैरसोय होत असताना दि.१९ सोमवार रोजी ऐन रक्षाबंधनाच्या दिवशी सुनिता अमोल बोरखडे रा.बोरखेड बाळंतीणीची दुपारी आलेल्या पावसामुळे छताला गळती लागल्याने हेळसांड झाली होती. संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी डॉ . उल्हास गंडाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना लेखी तक्रार करून रास्तारोको आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांनी रूग्णांची गैरसोय होऊ नये व आरोग्य सेवेवर परिणाम होऊ नये म्हणून गळती रोखण्यासाठी दुरुस्तीसाठी ५ लक्ष रुपयांचा निधी बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला होता.लिंबागणेश येथील आरोग्य केंद्राला गळती लागल्याने रूग्णांची




हेळसांड व गैरसोय याविषयी विविध दैनिकातुन मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाल्यानंतर त्याची दखल घेऊन अखेर आज दि.१९ रोजी आज प्राथमिक आरोग्य केंद्रातील छताच्या दुरूस्तीच्या कामाला सुरुवात झाली असुन आता भविष्यात पावसाळ्यात छत गळुन रूग्णांची होणारी हेळसांड थांबणार आहे.याबद्दल डॉ . गणेश ढवळे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे,आ.संदिप क्षीरसागर, डॉ . उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य अधिकारी बीड आणि प्रसार माध्यमांनी शासन दरबारी आवाज बुलंद केल्याबद्दल प्रसार माध्यमांचे आभार मानले आहेत.

# दुर्दैवी! एसटी बसचा आणि आयशर टेम्पोच्या भीषण अपघातत सहा जणांचा मृत्यू!

## जालना - वडीगोद्री मार्गावरील शहापूर जवळील घटना

**मठतांडा येथील ग्रामस्थांनी अपघातस्थळी धाव घेत बसच्या काचा फोडून जखमींना बाहेर काढले. यात सहा जणांचा जागीच मृत्यू झाले, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : जालना - वडीगोद्री मार्गावरील शहापूर जवळील वळणावर एसटी बसचा आणि संत्रा वाहतूक करणाऱ्या आयशर टेम्पोचा भीषण अपघात झाला. यामध्ये ६ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती असून, अनेक जण प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना शुक्रवारी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान घडली आहे. गेवराईहून अंबडकडे जाणारी गेवराई आगारातील बस क्रमांक एम एच २० बी एल ३५७३ आणि अंबडहून संत्रा घेऊन येणारा आयशर टेम्पो क्रमांक एम एच ०१ सी आर ८०९९ चा वडीगोद्री जालना मार्गावरील शहापूर जवळ भीषण अपघात झाला या अपघाताचा मोठा आवाज झाल्याने मठतांडा येथील ग्रामस्थांनी व पोलिसांनी अपघातस्थळी धाव घेत बसच्या काचा फोडून जखमींना बाहेर काढले. अपघातातील जखमींना उपचारासाठी तात्काळ अंबड येथील शासकीय रुग्णालयात हलवले आले होते. तर जागीच मृत्यू झालेल्यांना शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

हा अपघात इतका भीषण होती की, सहा प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीत व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मोसंबी ने भरलेला भरधाव आयशर टेम्पो हा दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करत होता. ओव्हरटेक करत असताना समोरून येणाऱ्या एसटी बसवर जोरदार आदळला. ओव्हरटेक करण्याच्या नादात हा अपघात झाला असल्याचे सांगितले जात आहे. या एसटी बसमध्ये एकूण २५ प्रवासी होते. यात एका लहान मुलांचा समावेश होता. अपघात होताच घटना स्थळी मठतांडा येथील नागरिकांनी धाव घेतली जखमींना बसमधून बाहेर काढून अपघाताची पोलीसांना देताच घटना स्थळी गोंदी पोलिस व वाहतूक पोलिसानी धाव घेत जखमींना उपचारासाठी रूग्णवाहिकाद्वारे अंबड, जालना येथे हलविण्यात आले आहे. अपघातामुळे वाहतूक कोंडी झाली होती. तसेच नागरिकांची मोठी गर्दी केली होती. पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली

काही मृतांची व जखमींची ओळख पटलेली नाही

जखमींना उपचारासाठी अंबड येथील शासकीय रुग्णालयात हलवले आहे. या अपघातामधील सहा मृतांपैकी गेवराई येथील वाहक बंडू बारगजे (वय वर्षे ५०) रा. गेवराई व रामपूरी येथील पंचफुला बाई सोळुंके यांची नावे समजली असून इतर जणांचे नाव अद्याप समजली नाहीत. त्याचबरोबर जखमींचे नावे समजू शकली नाहीत. या बसमध्ये एकूण २५ प्रवासी होते. यामध्ये एका लहान मुलाचा समावेश होता.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT